औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मंगळवार दिनांक २९.७.९१ रोजी झालेल्या ६४ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

---

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. अरविंद महाजन | उपसभापती/औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. गिरीश गोखले, विभागीय आयुक्त, नाशिक. | सदस्य |
| ४] श्री. मुन दे. हि. उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, औरंगाबाद. | सदस्य |
| ५] श्री. व. श. राजभोज, कार्यकारी अभियंता, आयुक्त म. न. पा. औरंगाबाद यांचे प्रतिनिधी | सदस्य |

प्रशासक/आयुक्त महानगरपालिका नाशिक हे सभेस अनुपस्थीत होते.

विषय:- दिनांक २८.६.९१ रोजी झालेल्या ६३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या ६३ व्या बैठकीतील विषय क्र. २ व ठराव क्र. ३७६ वर चर्चा करतांना मा. श्री. गिरीश गोखले विभागीय आयुक्त नाशिक यांनी विचारले की, अमृतधाम नाशिक येथे विडी कामगारांसाठी बांधलेल्या गाळयांना महानगरपालिका नाशिक पाणी का देत नाही व किती लांबीची पाईप लाईन टाकावी लागेल.

यावर उपसभापती, औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, नाशिक महानगरपालिकेकडे पाण्याच्या लाईन टाकण्यासाठी येणारा खर्च मंडळाने भरलेला आहे. परंतु सिंहस्थामुळे महानगरपालिकेस काम हाती घेता आलेले नाही. साधारणपणे पाऊण कि.मी. लांबीची आणि ६ इंची व्यासाची पाईप

लाईन टाकावी लागेल. महानगरपालिकेकडून पाण्याची व्यवस्था होईपावेतो वसाहतीमध्ये बोअरवेल घेऊन तात्पुरती पाण्याची व्यवस्था मंडळ करणार आहे.

श्री. दे. हि. मून, उपसंचालक नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग औरंगाबाद यांनी सूचना केलीकी, मंडळाकडून घेण्यांत येणाऱ्या बोअरवेलचे पाणीपिण्यास योग्य आहे किंवा नाही याची तपासणी करून प्रमाणपत्र घ्यावे व दफ्तरी असू द्यावे.

विभागीय आयुक्त/नाशिक यांनी सांगितले की, ऑक्टोबर ९१ मध्ये प्रशासक/महानगरपालिका नाशिक यांच्याकडन अमृतधाम, नाशिक येथील पाणीपुरवठयाचे काम करून घेण्याचा प्रयत्न करू.

ठराव क्र. ३८०

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने दिनांक २८. ६. ९१ रोजी झालेल्या ६३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: प्रायोगिक तत्वावरील १५ घरांच्या बांधकामाच्या ठेकेदाराने काम न केल्याबद्दल त्यांच्यावर करावयाची कार्यवाही.

ठराव क्र. ३८१

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्री. एल. एम. चंचलानी, प्रायोगिक तत्वावरील १५ घरांच्या बांधकामाचे ठेकेदार, यांनी, सदर गाळयांचे बांधकाम वेळोवेळी सूचना व नोटीसी देऊनही न केल्यामुळे मंडळाचे नुकसान झाले आहे म्हणून कंत्राटदाराचे नांव काळया यादीत टाकून त्यांना येत्या ३ वर्षात मंडळाच्या कामाचे टेंडर देण्यात येऊ नये. हया कार्यवाहीची प्रत सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यांत यावी व त्यांची सुरक्षा ठेव [ SECURITY DEPOSIT ] जप्त करण्यांत यावी.

विषय क्र. ३: औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाने जालना येथे बांधलेल्या ३५३ गाळ्यांचे विडी कामगारांना वितरीत करण्यांत येणाऱ्या गाळ्याबाबत.

---

या विषयावर चर्चा करतांना उपसभापती यांनी सांगितले की, जालना येथे विडी कामगारांसाठी ३५३ गाळ्यांची योजना राबविली आहे. सदर गाळ्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. ज्या विडी कामगारांचे अर्ज पात्र ठरले त्यांना दिनांक २१. ६. १९९१ रोजी वाटपाचे आदेश दिले आहेत. गाळा ताब्यात घेण्यापुर्वी रु. २७२५/- भरावयाचे आहेत. त्यापैकी त्यांनी रु. १४००/- आतापर्यन्त भरले आहेत व शिल्लक रक्कम रु. १३००/- भरावयाचे आहे.

दिनांक ९. ७. ९१ रोजी श्री. विजयेंद्र काबरा, अध्यक्ष, मराठवाडा राष्ट्रीय विडी मजदूर संघ यांनी, मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांची भेट घेऊन अशी विनंती केली की, जालना येथील विडी कामगारांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे रु. १३००/- भरणे शक्य नाही. त्यामुळे औरंगाबाद येथील विडी कामगारांना पैसे भरण्याची जी सवलत देण्यांत आली त्याप्रमाणे जालना येथील विडी कामगारांनाही देण्यांत यावी.

यावर मा. श्री. गिरीश गोखले विभागीय आयुक्त यांनी असे विचारले की, औरंगाबाद येथील विडी कामगारांना पैसे भरण्यास जी सवलत दिली त्याचा अनुभव काय आहे ?

उपसभापतीनी सांगितले की, औरंगाबाद येथील विडी कामगारांनी पैसे भरलेले नाहीत.

यावर विभागीय आयुक्त/नाशिक यांनी सांगितले की, विडी कामगारांच्या मालकांकडून त्यांच्या पगारातून पैसे वसुल करण्यासाठी सम्मतीपत्र घेऊन सदर सवलत देणे योग्य होईल.

ठराव क्र. ३८२

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, जालना येथील बिडी कामगारांकडून गाळा ताब्यात घेण्यापूर्वी घ्यावयाच्या रु. १३०० मधून ६९३ कमी करुन [१३००- ६९३]=६०७ हे सात हप्त्यात वसूल करावे. तसेच बिडी कामगारांकडून वसूल करावयाच्या रक्कमेसाठी त्यांच्या वेतनातून पैसे वसूल करण्यासाठी बिडी कामगारांच्या मालकांकडून सम्मतीपत्र घेणे शक्य असल्यास, घेण्यात यावे.

विषय क्र. ४: सिडको एन-७ [आर-२९] मध्ये ४८/५६ मध्यम उत्पन्न गटा अंतर्गत बांधलेल्या गाळ्यांच्या वाढीव किंमतीस मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ३८३

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने सिडको एन-७ [आर-२९] मध्ये ४८/५६ मध्यम उत्पन्न गट योजने अंतर्गत बांधलेल्या गाळ्यांच्या वाढीव किंमतीस मंजूरी दिली.

विषय क्र. ५: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपूर्ती करणेबाबत.

ठराव क्र. ३८४

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, कार्यकारी अभियंता/नाशिक यांच्या कार्यालयात काम करणारे विभागीय लेखापाल श्री. एन. आर. पवार यांनी त्यांच्या स्वत:च्या आजारपणासाठी [मुळव्याधिच्या अतिरक्तस्त्रावामुळे] खर्च रु. ३१२०.७० झाल्याचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता रु. ३०३०.७० देय ठरतात त्याप्रमाणे सदर रक्कमेपैकी नियमाप्रमाणे फक्त ९०% रक्कम त्यांना देता येईल सबब रु. ३०३०.७० च्या ९०% रक्कम रु. २७२८/- त्यांना प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे देयक तपासूनच अदा करावी.

. . .

विषय क्र. ६:- मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

श्री. दे. हि. मून, उपसंचालक नगररचना औरंगाबाद विभाग यांनी मंडळासमोर असा **प्रस्ताव** ठेवला की, तुळजापूर येथे औरंगाबाद मंडळाची जमिन आहे. या जमिनीपैकी काही जमिन नगरपरिषद तुळजापूर यांना शाळेसाठी दिली आहे. मंडळाच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर विकास आराखड्यात व्यापारी गाळ्यांसाठी आरक्षण आहे. नगरपरिषदेस व्यापारी संकुलासाठी न.प. ला हवी आहे. त्यामुळे सदर जमिन नगरपरिषद तुळजापूरला देण्यांत यावी.

यावर उपसभापती यांनी सांगितले की, नगरपरिषद तुळजापूरला पत्र पाठविण्यास सांगावे त्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

मा. सभापतीचे आभार मानून सभा संपली.

. . . .